# सार्थ श्रीराम हृदय

## || श्रीअध्यात्मरामायणांतर्गत ||

**यः पृथ्वीभरवारणाय दिविजैः संप्रार्थितश्चिन्मयः। संजातः पृथिवीतले रविकुले मायामनुष्योऽव्ययः।**
**निश्चक्रं हतराक्षसः पुनरगाद् ब्रह्मत्वमाद्यं स्थिरां। कीर्तिं पापहरां विधाय जगतां तं जानकीशं भजे॥ १॥**

पृथ्वीचा भार निवारण करण्यासाठी ज्या चिन्मय परमात्म्याची देवांनी प्रार्थना केली, असा तो अव्यय परमात्मा या पृथ्वीतलावर मायेच्या योगे सूर्यवंशामध्ये मनुष्य रूपात अवतरला. राक्षसांचा समूळ नाश करणारा अशी शाश्वत कीर्ति संपादन करणारा (तसेच) जगातील सर्व पाप निश्चयाने हरण करणारा असा तो जानकीचा ईश्वरच असलेला श्रीराम पुन्हा आपल्या मूळ अशा ज्ञानस्वरूपात, तसेच निर्विकार अशा ब्रह्मस्वरूपात जाऊ शकतो (अशा त्या श्रीरामाला) मी भजतो.

**विश्वोद्भवस्थितिलयादिषु हेतुमेकम्। मायाश्रयं विगतमायमचिन्त्यमूर्तिम्।**
**आनन्दसान्द्रममलं निजबोधरूपं। सीतापतिं विदिततत्त्वमहं नमामि॥ २॥**

विश्वाच्या उत्पात्ति, स्थिती आणि लय इ. सर्व अवस्थांचे एकमेव कारण, (तसेच) मायेचा आश्रय असणारा, परंतु मायेच्या शक्तीचा ज्याच्यावर परिणाम होत नाही (त्याचप्रमाणे) ज्याच्या मूळ स्वरूपाचे चिंतन करणेही केवळ अशक्य आहे, आनंदरूप, निर्मल आणि आत्मस्वरूपाचा बोध हाच ज्याच्या स्वरूपाचा बोध आहे असा तो सीतापति श्रीराम, (जो) स्वस्वरूपाला जाणणारा व जाणवणारा आहे, त्या (श्रीरामाला) मी वंदन करतो.

**पठन्ति ये नित्यमनन्यचेतसः। श्रृण्वन्ति चाध्यात्मिकसंज्ञि तं शुभम्। रामायणं सर्वपुराणसंमतं।**
**निर्धूतपापा हरिमेव यान्ति ते॥ ३॥**

जे कुणी अनन्य अशा एकाग्र भावाने (हे) अध्यात्म' असे नाव प्राप्त झालेले मंगलकारक आणि सर्व पुराणांना संमत असलेले रामायण श्रवण करतात किंवा वाचतात त्यांची सर्व पापे नष्ट होऊन ते हरिपदाला प्राप्त होतात.

**अध्यात्मरामायणमेव नित्यं। पठेद्यदीच्छेद्भवबन्धमुक्तिम्। गवां सहस्रायुतकोटिदानात्।**
**फलं लभेद्यः श्रृणुयात्स नित्यम्॥ ४॥**

जो मनुष्य भवबंधनातून मुक्त होण्याची इच्छा करीत असेल त्याने (ह्या) अध्यात्म रामायणाचे नित्य पठण करावे. त्याचप्रमाणे, जो कुणी याचे श्रवण करील, त्याला सहस्रायुत कोटी गोदानाचे फल त्यायोगे प्राप्त होईल.

**त्रिपुरारिगिरिसंभूता श्रीरामार्णवसंगता। अध्यात्मरामगंगेयं पुनाति भुवनत्रयम्॥ ५॥**

त्रिपुरासुराचा अरि-म्हणजे शत्रू असा जो (भगवान्) श्रीशंकर त्या श्रीशंकररूपी पर्वतापासून उगम पावलेली आणि अखेर श्रीरामरूपी समुद्राला मिळणारी, अशी ही अध्यात्मरामायणाची गंगा त्रिभुवनाला पवित्र करणारी आहे.

**कैलासाग्रे कदाचिद्रविशतविमले, मन्दिरे रत्नपीठे। संविष्टं ध्याननिष्ठं त्रिनयनमभयं, सेवितं सिद्धसंगै॥**
**देवी वामाङ्कसंस्था गिरिवरतनया, पार्वती भक्तिनम्रा। प्राहेदं देवमीशंसकलमलहरं, वाक्यमानन्दकन्दम्॥ ६॥**

एकदा, कैलास पर्वताच्या शिखरावर प्रकाशमान् अशा आपल्या मंदिरात रत्नजडित अशा आसनावर ध्यानस्थ बसलेल्या, तसेच, सिद्ध समुदायाकडून सेवा घेणाऱ्या, सर्व पापांचा नाश करणाऱ्या आणि आनंदाचा जणू गाभाच असलेल्या अशा तीन नेत्र असलेल्या देवाधिदेव श्रीशंकरांना त्यांच्या डाव्या मांडीवर स्थानापन्न झालेली अशी पर्वतश्रेष्ठ (हिमालयाची) कन्या, पार्वती अत्यंत नम्रपणे, भक्तिभावाने म्हणाली –

## श्री पार्वत्युवाच

**नमोऽस्तु ते देव जगन्निवास, सर्वात्मदृक् त्वं परमेश्वरोऽसि।**
**पृच्छामि तत्त्वं पुरुषोत्तमस्य, सनातनं त्वं च सनातनोऽसि॥७॥**

पार्वती म्हणाली, 'हे देवा, मी तुला नमन करते. अखिल जगतात (चराचरात) भरून राहिलेला आणि सर्वामध्ये आत्मरूपाने पाहता येणारा असा तू परमेश्वरच आहेस. तू स्वत: सनातन असल्यामुळे मी तुलाच त्या सनातन पुरुषोत्तमाचे (परब्रह्माचे) तात्विक स्वरूप विचारते.

**गोप्यं यदत्यन्तमनन्यवाच्यं, वदन्ति भक्तेषु महानुभावाः।**
**तदाप्यहोऽहं तव देव भक्ता, प्रियोऽसि मे त्वं वद यत्तु पृष्टम्॥८॥**

हे परब्रह्माचे स्वरूप (खरेतर) अत्यंत गुप्त आहे. परंतु तरी देखील महानुभाव असे साधुपुरुष ते आपल्या भक्तांना सांगतात. हे देवा, मी आपली भक्त आहे, शिवाय आपण मला अत्यंत प्रिय आहात, तेव्हा आपण मला ते सांगा.

**ज्ञानं सविज्ञानमथानुभक्ति, वैराग्ययुक्तं च मितं विभास्वत्।**
**जानाम्यहं योषिदपि त्वदुक्तं, यथा तथा ब्रूहि तरन्ति येन॥९॥**

मी स्त्री आहे, तेव्हा ज्यामुळे सामान्य जन (जीव) तरुन जातात, असे ते वैराग्य आणि भक्तियुक्त तसेच अनुभवास येणारे ज्ञान आपण मला थोडक्यात परंतु स्पष्टपणे व समजेल अशा प्रकारे सांगा.

**पृच्छामि चान्यच्च परं रहस्यं, तदेव चाग्रे वद वारिजाक्ष।**
**श्रीरामचन्द्रेऽखिललोकसारे, भक्तिर्दृढा नौर्भवति प्रसिद्धा॥१०॥**

हे कमलनेत्र श्री शंकरा, दुसरी एक रहस्यपूर्ण गोष्ट मी आपणास विचारते ती आपण मला प्रथम सांगा. सर्व गोष्टींचे सारच असलेल्या श्रीरामचंद्राच्या ठायी दृढ भक्ति ठेवणे हीच भवसागर तरून जाण्याची प्रसिद्ध नौका होय.

**भक्तिः प्रसिद्धा भवमोक्षणाय, नान्यत्ततः साधनमस्ति किञ्चित्।**
**तथापि हृत्संशयबन्धनं मे, विभेत्तुमर्हस्यमलोक्तिभिस्त्वम्॥११॥**

संसारातून मुक्त होण्यासाठी भक्ती हेच प्रसिद्ध साधन आहे. दुसर कोणतेही नाही. तथापि माझ्या हृदयात (अजूनही) जे संशयाचे बंध आहत त्यांची आपल्या भाषणाने आपण उकल करा.

**वदन्ति रामं परमेकमाद्यं, निरस्तमायागुणसंप्रवाहम्।**
**भजन्ति चाहर्निशमप्रमत्ताः परं पदं यान्ति तथैव सिद्धाः॥१२॥**

श्रीराम हाच सर्वाचे आदिकारण व सर्व श्रेष्ठ आहे. मायेमुळे निर्माण होणाऱ्या गुणप्रवाहाचा त्यानेच निरास केला आहे, असे त्याच्या विषयी सांगतात. रात्रंदिवस त्याचे जे भजन करतात ते ज्ञानी सिद्ध पुरुष परमपदाला जाऊन पोचतात.

**वदन्ति केचित्परमोऽपि रामः, स्वाविद्यया संवृतमात्मसंज्ञम्।**
**जानाति नात्मानमतः परेण, संबोधितो वेद परात्मतत्त्वम्॥१३॥**

काहीजण असे म्हणतात की श्रीराम हा सर्वश्रेष्ठ (ज्ञानी) असूनही त्याचे आत्मस्वरूप स्वत:च्याच मायारूपी अविद्येने वेष्टिले गेल्यामुळे तो ते स्वत:ही जाणत नव्हता. म्हणून (गुरूने) त्या संदर्भात त्याला उपदेश केल्यानंतरच त्याला स्वत:च्या श्रेष्ठ अशा परमात्म स्वरूपाची ओळख झाली.

**यदि स्म जानाति कुतो विलापः, सीताकृतेऽनेन कृतः परेण।**
**जानाति नैवं यदि केन सेव्यः, समो हि सर्वैरपि जीवजातैः॥१४॥**

त्याला जर स्वस्वरूपाचे ज्ञान होते तर त्याने सीतेसाठी शोक का केला? तेव्हा ज्ञान नव्हते म्हणावे तर इतर (सर्व सामान्य) जीवांप्रमाणेच त्याची योग्यता नव्हे का? मग त्याची सेवा कुणी का करावी?

**अत्रोत्तरं किं विदितं भवद्भिस्तद्ब्रूत मे संशयभेदि वाक्यम् ॥१५॥**

या (माझ्या) प्रश्नाचे जे उत्तर आपणास ठाऊक असेल आणि जे सांगण्यामुळे माझा संशय नाहीसा होईल ते आपण मला सांगावे.

श्रीमहादेव उवाच

**धन्याऽसि भक्तासि परात्मनस्त्वं, यज्ज्ञातुमिच्छा तव रामतत्त्वम् ।**

**पुरा न केनाप्यभिचोदितोऽहं, वक्तुं रहस्यं परमं निगूढम् ॥१६॥**

(यावर) श्री महादेव म्हणाले, (ब्रह्मस्वरूप असे) रामतत्त्व जाणून घेण्याची ज्याअर्थी तुला इच्छा झाली आहे, त्या अर्थी तू (खरोखरच) धन्य आहेस. त्या परमात्म्याची तू (श्रेष्ठ अशी) भक्त आहेस. (कारण) या पूर्वी हे अत्यंत गूढतम असे रहस्य सांगण्यासाठी कुणीही मला प्रश्न केला नव्हता..

**त्वयाऽद्य भक्त्या परिनोदितोऽहं, वक्ष्ये नमस्कृत्य रघूत्तम ते ।**

**रामः परात्मा प्रकृतेरनादिरानन्द एकः पुरुषोत्तमो हि ॥१७॥**

(परंतु) तू आज मला भक्तिभावाने विचारले आहेस म्हणून त्या रघुत्तमाला नमस्कार करून मी ते (रहस्य) तुला सांगतो. राम हा परमात्माच असून तो अनादी, आनंदरूप असा पुरुषोत्तम आहे.

**स्वमायया कृत्स्नमिद हि सृष्टवा, नभोवदन्तर्बहिरास्थितो यः ।**

**सर्वान्तरस्थोऽपि निगूढ आत्मा, स्वमायया सृष्टमिदं विचष्टे ॥१८॥**

स्वत:च्या मायेने ही सर्व सृष्टी निर्माण करून आकाशाप्रमाणे (जगाच्या) आत बाहेर राहणारा तो सर्वांच्या अंतर्यामी असूनही गुप्तच असतो व आपल्या मायेने निर्माण केलेल्या सृष्टीकडे पाहत असतो.

**जगन्ति नित्यं परितो भ्रमन्ति, यत्सन्निधौ चुम्बकलोहवद्धि ।**

**एतन्न जानन्ति विमूढचित्ता:, स्वाविद्यया संवृतमानसा ये ॥१९॥**

लोहचुम्बकाच्या सान्निध्याने जसे लोखण्ड त्या चुम्बकाभोवती फिरते, त्याप्रमाणे ह्याच्या सान्निध्यात असलेले जग (अनेक ब्रह्माण्डे) ह्याच्या भोवती फिरत असते. परंतु अज्ञानी मनुष्याला हे समजत नाही. (कारण) त्याच्या अंत:करणावर अविद्येचे आवरण पडलेले असते.

**स्वाज्ञानमप्यात्मनि शुद्धबुद्धे, स्वारोपयन्तीह निरस्तमाये ॥**

**संमारमेवानुसरन्ति ते वै, पुत्रादिसक्ताः पुरुकर्मयुक्ताः ॥२०॥**

पुत्रादिकांच्या ठिकाणी आसक्त झालेले (आणि) विविध कर्मांमध्ये बुडालेले ते लोक निर्मल, ज्ञानी आणि (केवळ) परमेश्वरूप अशा त्याला (रामाला) ओळखत नाहीत व (नित्य) संसार करीत राहतात.

**जानन्ति नैवं हृदये स्थितं वै, चामीकरं कण्ठगतं यथाऽज्ञाः**

**यथाऽप्रकाशो न तु विद्यते रवौ, ज्योति: स्वभावे परमेश्वरे तथा ।**

**विशुद्धविज्ञानघने रघूत्तमेड विद्या कथं स्यात्परः परात्मनि ॥२१॥**

ज्याप्रमाणे अज्ञ (मूर्ख) व्यक्तीला स्वत:च्या गळ्यातील सुवर्णालंकाराचे भान नसते, त्याचप्रमाणे त्यांना स्वत:च्या हृदयात असलेल्या रामाला जाणता येत नाही. ज्याप्रमाणे तेजस्वी (प्रकाशमान) सूर्याच्या ठिकाणी अंध:कार राहणे शक्य नाही,

त्याचप्रमाणे, तेजोरूप, निर्मल आणि ब्रह्मज्ञानाने परिपूर्ण अशा प्रत्यक्ष परमात्मरूप श्रीरामाच्या ठिकाणी अजान कोठून असणार?

**यथा हि चाक्ष्णा भ्रमता ग्रहादिकं, विनष्टदृष्टेर्भ्रमतीव दृश्यते।**

**तथैव देहेन्द्रियकर्तुरात्मनः कृत परेऽध्यस्य जनो विमुह्यति॥२२॥**

जसे, स्वत: भोवती फिरताना मनुष्याला (बाजूची) घरे इत्यादीही सर्वच फिरल्यासारखे दिसते, अगदी तसेच, शरीर आणि इंद्रिये ह्यांच्या ठिकाणी गुंतून पडल्यामुळे आत्म्याकडून केले जाणारे कर्म परमात्म्यावर आरोपिले गेल्यामुळे प्राणी मोहित होतात.

**नाहो न रात्रिः सवितुर्यथा भवेत्, प्रकाशरूपाऽव्यभिचारतः क्वचित्।**

**ज्ञानं तथाऽज्ञानमिदं द्वयं हरौ,रामे कथं स्थास्यति शुद्धचिद्घने॥२३॥**

प्रकाशरूप सूर्याच्या ठिकाणी दिवस वा रात्र कधीच नसतात. कारण त्याचे प्रकाशरूप कधीच नष्ट होत नाही. अगदी त्याचप्रमाणे, शुद्ध ज्ञानाने संपन्न असलेल्या वसंकटे हरण करणाऱ्या श्रीरामाच्या ठिकाणी ज्ञान अथवा अज्ञान दोन्हीही राहत नाहीत.

**तस्मात्परानन्दमये रघूत्तमे, विज्ञानरूपे हि न विद्यते तमः।**

**अज्ञानसाक्षिण्यरविन्दलोचने मायाश्रयत्वान्न हि मोहकारणम्॥२४॥**

त्यामुळे परमानंदरूप आणि शुद्ध ज्ञानस्वरूप, अज्ञानरूप मायेचा केवळ साक्षी असलेला जो कमलनयन श्रीराम त्याच्या ठिकाणी मोह उत्पन्न करणारे अज्ञान, तो स्वत:च मायेचा आश्रय असल्यामुळे राहतच नाही.

**अत्र ते कथयिष्यामि रहस्यमपि दुर्लभम्। सीतारामामरुत्सूनुसंवादं मोक्षसाधनम्॥२५॥**

आता याठिकाणी मोक्षप्रात्रीला साधनभूत होणारा अत्यंत दुर्लभ असा सीता, रामचंद्र आणि वायुपुत्र हनुमान यांचा रहस्यमय संवाद मी तुला सांगतो.

**पुरा रामायणे रामो रावणं देवकण्टकम्। हत्वा रणे रणश्लाघी सुपुत्रबलवाहनम्॥२६॥**

पूर्वी रामायणकाळी देवांचा शत्रु असलेल्या रावणाचा श्रीरामाने रणांगणामध्ये त्याचे सुपुत्र, सैन्य (आणि) वाहने यांच्यासह नाश करून

**सीतया सह सुग्रीवलक्ष्मणाभ्यां समन्वितः। अयोध्यामगमद्रामो हनूमत्प्रमुखैर्वृतः॥२७॥**

श्रीराम हा सीता, सुग्रीव लक्ष्मण इत्यादींसह, तसेच हनुमान् वगैरे प्रमुखांना घेऊन अयोध्येला पोहोचला.

**अभिषिक्तः परिवृतो वसिष्ठाद्यैर्महात्मभिः। । सिंहासने समासीनः कोटिसूर्यसमप्रभः॥२८॥**

त्यानंतर वसिष्ठादी महान् ऋषींकडून अभिषेक करण्यात आल्यावर, कोटिसूर्यांप्रमाणे तेजस्वी असलेला श्रीराम अनेक मंडळीनी वेष्टित अशा सिंहासनावर येऊन बसला.

**दृष्ट्वा तदा हनूमन्तं प्राजलिं पुरतः स्थितम्। कृतकार्यं निराकाङ्क्षं ज्ञानापेक्षं महामतिम्॥२९॥**

त्याप्रसंगी ज्याने अनेक (कठीण) कार्ये पार पाडली (परंतु) ज्याला ज्ञानप्राप्तीपेक्षा अन्य कशाचीच अपेक्षा नाही, असा महा बुद्धिवान, हनुमान समोर हात जोडून उभा राहिलेला पाहून

**रामः सीतामुवाचेदं ब्रूहि तत्त्वं हनूमते। निष्कल्मषोऽयं ज्ञानस्य पात्रं नौ नित्यभक्तिमान्॥३०॥**

श्रीराम सीतामाईला म्हणाला (हे सीते), आता तू या हनुमंताला सत्ततत्वाचा उपदेश कर. हा ज्ञानोपदेशघेण्याला (पूर्णत:) पात्र असून, आम्हा दोघांचीही भक्ती करणारा तसेच निष्कलंक व निष्पाप आहे.

**तथेति जानकी प्राह तत्त्वं रामस्य निश्चितम्। हनुमते प्रपन्नाय सीता लोकविमोहिनी॥३१॥**

त्या वर ‘ठीक आहे', असे म्हणून, लोकांच्या मनाला मोहित करणारी सीता, हनुमंताला श्रीरामाचे सत्यस्वरूप निश्चितपणे समजेल अशा प्रकारे सांगू लागली.

### श्री सीतोवाच

**रामं विद्धि परं ब्रह्म सच्चिदानन्दमद्वयम्। सर्वोपाधिविनिर्मुक्तं सत्तामात्रमगोचरम्॥३२॥**

(त्यावेळी) सीता म्हणाली, (हे हनुमंता) सच्चिदानंदस्वरूप, तसेच, अद्वितीय, सर्व उपाधीपासून पूर्णपणे मुक्त सत्तारूपाने सर्वत्र व्यापून असणारे (तसेच) कोणत्याही इंद्रियाला न समजणारे असे जे ब्रह्मतत्त्व तेच श्रीरामाचे (सत्य) स्वरूप आहे.

**आनन्दं निर्मलं शान्तं निर्विकारं निरंजनम। सर्वव्यापिनमात्मानं स्वप्रकाशमकल्मषम्॥३३॥**

तो श्रीराम आनंदस्वरूप, निर्मल (शुद्ध) शांत, निर्विकार अज्ञान व माया रहित, सर्वांना व्यापून असणारा, स्वयंप्रकाशी आणि निष्पाप आहे असे जाण.

**मां विद्धि मूलप्रकृतिं सर्गस्थित्यन्तकारिणीम्। तस्य संनिधिमात्रेण सृजामीदमतन्द्रिता॥३४॥**

'मी आदियामा असून उत्पत्ति, स्थिती व लय करणारी अशी आहे. केवळ त्याच्या सान्निध्यानेच हे विश्व मी निर्माण करते.

**तत्सान्निध्यान्मया सृष्टं तस्मिन्नारोप्यतेऽबुधैः। अयोध्यानगरे जन्म रघुवंशेऽतिनिर्मले॥३५॥**

त्याच्या सान्निध्यात हे जग मी निर्माण केले असूनही अज्ञानी लोकांकडून त्याचे कर्तृत्व, त्याच्या सान्निध्यामुळे त्याच्या ठायीच आरोपिले जाते. अयोध्या नगरीत अति निर्मल अशा रघुवंशात जन्म घेणे;

**विश्वामित्रसहायत्वं मखसंरक्षणं ततः। अहल्याशापशमनं चापभङ्गो महेशितुः॥३६॥**

विश्वामित्रांना सहाय्य करणे, यज्ञाचे रक्षण करणे, त्याचप्रमाणे अहल्येला शापमुक्त करणे,
श्री शिवाच्या धनुष्याचा भंग करणे,

**मत्पाणिग्रहणं पश्चाद्भार्गवस्य मदक्षयः। अयोध्यानगरे वासो मया द्वादशवार्षिकः॥३७॥**

माझ्याशी विवाह करणे, परशुरामाचा गर्व नाहीसा करणे, त्याचप्रमाणे अयोध्या नगरीत माझ्यासह बारा वर्षे वास करणे,

**दण्डकारण्यगमनं विराधवध एव च। मायामारीचमरणं मायासीताहतिस्तथा॥३८॥**

दण्डकारण्यात जाणे, विराधाचा वध करणे, त्याचप्रमाणे मायावी मारिचाचे मरण, (आणि)
मायेने निर्माण केलेल्या सीतेचे हरण

**जटायुषो मोक्षलाभः कबन्धस्य तथैव च। शबर्याः पूजनं पश्चात्सुग्रीवेण समागमः॥३९॥**

जटायू, त्याचप्रमाणे कबंधाला मोक्षाचा लाभ, शबरीकडून झालेले पूजन, नंतर सुग्रीवाशी भेट,

**वालिनश्च वधः पश्चात्सीतान्वेषणमेव च। सेतुबन्धश्च जलधौ लंकायाश्च निरोधनम्॥४०॥**

वालीचा वध, त्यानंतर सीतेचा शोध, समुद्रावर सेतु बांधणे, (आणि) लंकेला वेढा घालणे,

**रावणस्य वधो युद्धे सपुत्रस्य-दुरात्मनः। बिभीषणे राज्यदानं पुष्पकेण मया सह॥४१॥**

(पुढे) युद्धात दुष्ट रावणाचा त्याच्या पुत्रांसह वध, बिभीषणाला (लंकेच्या) राज्याचे दान,
नंतर माझ्यासह पुष्पक विमानातून

**अयोध्यागमनं पश्चाद्राज्ये रामाभिषेचनम्। एवमादीनि कर्माणि मयैवाचरितान्यपि।**
**आरोपयन्ति रामेऽस्मिन्निर्विकारे खिलात्मनि॥४२॥**

अयोध्येस आगमन, त्यानंतर रामाला राज्याभिषेक, अशा सर्व गोष्टी माझ्याकडूनच घडविल्या गेल्या आहेत.

पण ह्या सर्व गोष्टींचे कर्तृत्व सर्वांच्या अंतरात असलेल्या विकाररहीत अशा श्रीरामाच्या ठायीच लोकांकडून आरोपिले जाते.

**रामो न गच्छति न तिष्ठति नानुशोच त्याकाङ्क्षते त्यजति नो न करोति किञ्चित् ।**
**आनन्दमूर्तिरचल: परिणामहीनो। मायागुणाननुगतो हि तथा विभाति ॥४३॥**
(खरे तर) श्रीराम चालत नाही, उभा राहत नाही, कशाचाही शोक करीत नाही, की कोणत्याही गोष्टीची इच्छा करीत नाही (तसेच) कशाचाही त्याग करीत नाही, किंवा काहीच करीत नाही. तो आनंदरूप, अढळ, परिणाम शून्य असा आहे. परंतु मायेने निर्माण होणाऱ्या गोष्टींना तो आधारभूत असल्यानेच तो तसा (सृष्टिरूप) भासतो.

श्रीमहादेव - उवाच

**ततो रामः स्वयं प्राह हनूमन्तमुपस्थितम्। श्रृणु तत्त्वं प्रवक्ष्यामि ह्यात्मानात्मपरात्मनाम्॥४४।।**
श्रीमहादेव म्हणाले, त्यानंतर श्रीराम जवळ असलेल्या हनुमन्ताला म्हणाला, हे पहा, मी आता आत्मा अनात्मा, आणि परात्मा, (म्हणजेच ईश्वर, जीव आणि शुद्ध चैतन्य) ह्यांचे तत्त्व काय आहे ते (तुला) सांगतो.
**आकाशस्य यथा भेदस्त्रिविधो दृश्यते महान्। जलाशये महाकाशस्तदवच्छिन्न एव हि।**
**प्रतिबिम्बाख्यमपरं दृश्यते त्रिविधं नभः॥४५॥**
आकाशाचे ज्याप्रमाणे तीन भेद दिसतात जसे मोठे आकाश, जलाशयात मर्यादित झालेले आकाश आणि पाण्यात प्रतिबिंबीत झालेले आकाश असे तीन प्रकारचे आकाश दिसते,
**बुद्ध्यवच्छिन्नचैतन्यमेकं पूर्णमथापरम्। आभासस्त्वपरं बिम्बभूतमेवं त्रिधा चितिः॥४६॥**
तसेच, बुद्धिरूपी उपाधीने युक्त असे चैतन्य (म्हणजे ईश्वर), त्याचप्रमाणे प्रतिबिंबरूपी चैतन्य (म्हणजे जीव) आणि बिंबभूत (आधारभूत) असे चैतन्य (शुद्ध चैतन्य) असे चैतन्याचे तीन प्रकार आहेत.
**साभासबुद्धेः कर्तृत्वमविच्छिन्नेऽविकारिणी। साक्षिण्यारोप्यते भ्रान्त्या जीवत्वं च तथाऽबुधेः॥४७॥**
चैतन्याच्या आभासाने युक्त अशा बुद्धीचे वा अंत:करणाचे कर्तृत्व तसेच जीवत्व हे अज्ञानी जन केवळ भ्रांतीमुळे साक्षीभूत मर्यादातीत आणि अविकारी अशा शुद्ध चैतन्यावर आरोपित करतात.
**आभासस्तु मृषाबुद्धिरविद्याकार्यमुच्यते। अविच्छिन्नं तु तद्ब्रह्म विच्छेदस्तु विकल्पतः॥४८॥**
आभास याचा अर्थ प्रतिबिंब. हे खरोखर मिथ्या (खोटे) ज्ञानच होय. ते अविद्येमुळे उत्पन्न होते. खरे तर ते मूळ ब्रह्म भेदरहित आहे तरीपण त्याच्या ठिकाणी अज्ञानामुळे वा भ्रमामुळे भेद दिसतो.
**अवच्छिन्नस्य पूर्णेन एकत्वं प्रतिपाद्यते। तत्त्वमस्यादिवाक्यैश्च साभासस्याहमस्तथा॥४९॥**
अशा चैतन्याच्या ठायी भेद उत्पन्न झाला असता आभास वा प्रतिबिंबयुक्त जीवाचे 'तत् त्वम् असि' (ते तूच आहेस) अशा प्रकारच्या महावाक्यांनी शुद्ध चैतन्याशी ऐक्य प्रतिपादन केले जाते.
**ऐक्यज्ञानं यदोत्पन्नं महावाक्येन चात्मनोः। तदाऽविद्या स्वकार्यैश्च नश्यत्येव न संशयः॥५०॥**
'तत्वमसि' या महावाक्याच्या योगाने जीव आणि शिव यांचे ऐक्य समजून आले की मग, अविद्या (म्हणजेच अज्ञान) आपल्या कार्यासहित त्वरित नष्ट पावते, यात काहीही संशय नाही.
**एतद्विज्ञाय मद्भक्तो मद्भावायोपपद्यते। मद्भक्तिविमुखानां हि शास्त्रगर्तेषु मुह्यताम्।**
**न ज्ञानं न च मोक्षः स्यात्तेषां जन्मशतैरपि॥५१॥**
ही गोष्ट जाणल्याने माझा भक्त माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. परंतु माझ्या भक्तीपासून दूर असणाऱ्यांना शास्त्ररूपी गर्तेत

(म्हणजे खड्ड्यात) मोहाच्या योगे पडल्यामुळे शेकडो जन्म घेऊन देखील ज्ञान अथवा मोक्ष मिळणार नाही.

**इदं रहस्यं हृदयं ममात्मनो, मयैव साक्षात्कथितं तवानघ। मद्भक्तिहीनाय शठाय न त्वया,**
**दातव्यमैन्द्रादपि राज्यतोऽधिकम् ॥५२ ॥**

(हे हनुमन्ता) 'माझ्या स्वरूपासंबंधीचे हे गुप्त रहस्य (म्हणजे ‘राम हृदय') मी तुला सांगितले आहे. याची योग्यता इंद्राच्या राज्यापेक्षाही अधिक आहे. त्यामुळेच ज्यांची माझ्यावर भक्ती नाही अशा शठाला (दुष्टाला) ह्याचा उपदेश तू करू नकोस.

श्रीमहादेव उवाच।

**एतत्तेऽभिहितं देवि श्रीरामहृदयं मया। अतिगुह्यतमं हृदयं पवित्रं पापशोधनम् ॥५३ ॥**

श्रीमहादेव म्हणाले, “हे देवी पार्वति, मी तुला हे अत्यंत गुह्य, मनोहर, पवित्र आणि पापाचा नाश करणारे असे 'श्रीरामहृदय' आता सांगितले आहे.

**साक्षाद रामेण कथितं सर्ववेदान्तसंग्रहम्। यः पठेत्सततं भक्त्या स मुक्तो नात्र संशयः ॥५४||**

साक्षात् श्रीरामानेच सांगितलेल्या सर्व वेदांतील सिद्धान्तांचे सार असलेल्या ह्या रामहृदयाचे, जो भक्तिपूर्वक नित्य पठण करील, तो मुक्त होईल ह्यांत संशय नाही.

**ब्रह्महत्यादिपापानि बहुजन्मार्जितान्यपि। नश्यन्त्येव न सन्देहो रामस्य वचनं यथा ॥५५।।**

त्यामुळे ब्रह्महत्यादि पा किंवा पूर्वीच्या अनेक जन्मांमध्ये संपादन केलेली पापे देखील निःसंदेह नाश पावतील असे स्वतः श्रीरामाचेच वचन आहे.

**योऽतिभ्रष्टोऽतिपापी परधनपरदारेषु नित्योद्यतो वा स्तेयी ब्रह्मघ्नमातापितृवधनिरतो योगिवृन्दापकारी।**
**यः सम्पूज्याभिरामं पठति च हृदयं रामचन्द्रस्य भक्त्या ।**
**योगीन्द्रैरप्यलभ्यं पदमिह लभते सर्वदेवैः स पूज्यम् ॥५६ ॥**

अत्यंत भ्रष्ट, अत्यंत पापी, परधन आणि परस्त्री ह्यांचे हरण करण्यास नित्य उत्सुक असणारा, चोरी करणारा, ब्रह्महत्या वा मातापित्यांचा वध करण्यास सिद्ध असणारा, साधूंना अपकार किंवा पीडा करणारा, असा कोणीही असो, तो जर श्रीरामाची पूजा करून आणि भक्तिपूर्वक ह्या रामहृदयाचे पठण करील तर श्रेष्ठ योग्यांनाही दुर्लभ आणि सर्व देवांना पूज्य अशा त्या ब्रह्मपदाला जाईल.

**॥ इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे बालकाण्डे श्रीरामहृदयं नाम प्रथमः सर्गः ॥**

॥श्रीराम॥

## चतुर्थ दशक: नामस्मरणभक्ति तिसरा समास

मागां निरोपिलें कीर्तन। जे काळांस करी पावन।आतां ऐका विष्णोस्मरण। तिसरी भक्ति॥१॥
स्मरण देवाचें करावें। अखंड नाम जपत जावें। नामस्मरणें पावावें। समाधान॥२॥
नित्यनेम प्रात:काळीं। माध्याह्नकाळी सायंकाळीं। नामस्मरण सर्वकाळी। करीत जावें॥३॥
सुख दुःख उद्वेग चिंता। अथवा आनंदरूप असतां। नामस्मरणेंवीण सर्वथा। राहोंचि नये॥४॥
हर्षकाळी विषमकाळीं। पर्वकाळी प्रस्तावकाळीं। विश्रांतिकाळी निद्राकाळीं। नामस्मरण करावें ५॥
कोडें सांकडे संकट। नाना संसार खटपट। अवस्था लागतां चटपट। नामस्मरण करावें॥६॥
चालता बोलता धंदा कारतां। खातां जेवितां सुखी होता। नाना उपभोग भोगितां। नाम विसरों नये॥७॥
संपत्ति अथवा विपत्ति। जैशी पडेल काळगति। परीनामस्मरणाची स्थिति। सांडोचि नये॥८॥
वैभव सामर्थ्य आणि सत्ता। नाना पदार्थ चालतां। उत्कट भाग्यश्री भोगिता । नामस्मरण सांडूं नये॥९॥
आधी अवदसा मग दशा। अथवा दशेउपरी अवदसा। प्रसंग असो भलतैसा। परंतु नाम सोडूं नये॥१०॥
नामें संकटें नासती। नामें विघ्नें निवारती। नामस्मरणे पाविजेती। उत्तम पदें॥११॥
भूतपिशाच नाना छंद। ब्रह्मग्रह ब्राह्मणसमंध। मंत्रचळ नाना खेद। नामनिष्ठे नासती॥१२॥
नामें विषबाधा हरती। नामें चेडें चेटकें नासती॥ नामें होय उत्तमगती। अंतकाळीं॥१३॥
बालपणी तरुणकाळीं। कठिणकाळी वृद्धापकाळीं। सर्वकाळी अंतकाळीं। नामस्मरण असावें॥१४॥
ह्या नामाचा महिमा जाणे शंकर। जना उपदेशी विश्वेश्वर। वाराणसी मुक्तिक्षेत्र। रामनामेंकरूनी॥१५॥
या उफराट्या नामासाठी। वाल्मीक तरला उठाउठी। भविष्य वदला शतकोटी। चरित्र रघुनाथाचे॥१६॥
हरिनामें प्रल्हाद तरला। नाना अपघातांपासूनि सुटला। नारायणनामें पावन झाला। अजामेळ॥१७॥
नामें पाषाण तरले। असंख्यात भक्त उद्धरले। महापापी तेचि झाले। परमपवित्र॥१८॥
परमेश्वराची अनंत नामें। स्मरतां तरिजे नित्यनेमें। नामस्मरण करितां यमें। बाधिजेना॥१९॥ सहस्रनामांमध्ये कोणी एक।
म्हणतां होतसे सार्थक। नाम स्मरतां पुण्यश्लोक। होईजे स्वयें॥२०॥
कांहींच न करूनि प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागीं सांभाळी॥२१॥
नाम स्मरे निरंतर। तें जाणावें पुण्यशरीर। महादोषांचे गिरिवर। रामनामें नासती॥२२॥
अगाध महिमा न वचे वदला। नामें बहुत जन उद्धरला। हालाहालापासूनि सुटला। प्रत्यक्ष चंद्रमौळी॥२३॥
चंहू वर्णांसि नामाधिकार। नामीं नाहीं लहानथोर। जडमूढ पैलपार। पावती नामें॥२४॥
म्हणोनि नाम अखंड स्मरावें। रूप मनीं आठवावें। तिसरी भक्ति स्वभावें। निरोपिली॥२५॥
**इति श्रीमदासबोधे गुरुशिष्यसंवादे चतुर्थदशके नामस्मरणनिरूपणं नाम तृतीय: समासः॥**